# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 23/04/2020 (गुरूवार)
(सकाळ)

## दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 09 कि. मी. अंतरावर मौजा वलनी येथे दिनांक 21/04/2020 चे 20.00 वा. ते 22.00 वा. दरम्यान आरोपी नामे– अफसर याचा मोठा मुलगा, रा. वलनी याने फिर्यादी नामे– सुनिल तेजराम निकोसे, वय 34 वर्ष, रा. वलनी यांना थांबवुन "तु माझे उधारीचे पैसे व दुकानाचे पैसे का दिले नाही.'' या कारणावरून आरोपीने फिर्यादीला हातबुक्कीने मारहाण करून जखमी केले त्यामुळे फिर्यादीचे दात हालत आहे. तसेच आरोपीने फिर्यादीच्या घरी जावुन मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नामदेव धांडे 9764401246 हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर तारसा येथे दिनांक 21/04/2020 चे 19.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शेषराव कोलबाजी येळने, वय 42 वर्ष, रा. तारसा ज्वाईन्ट यांचा लहान भाउ इंद्रपाल येळणे व फिर्यादीची पत्नी सौ उर्मिला शेषराव येळणे असे घरी हजर होते. दरम्यान आरोपी 1) इंद्रराज पटीये, 2) रमेश पटीये, 3) जितु पटीये, 4) सुरज खंडाईत, 5) आकाश खंडाईत 6) अमीत डोकरीमारे, सर्व रा. तारसा, त. मौदा 7) दुर्गेश पटीये, रा. पारडी जि नागपुर 8) सुमीत मनघटे, रा. खंडारा त मौदा व ईतर काही लोक यांनी संगनमत करून जुन्या वादाचे कारणावरून (रोड लाईट) हातात काठी घेवुन फिर्यादीच्या घरी आले 'तुम्ही घराचे बाहेर निघा असे म्हणुन' अश्लिल शिवीगाळ देवु लागले. यानंतर फिर्यादी व सर्व भितीमुळे घराचे मागे जावुन लपुन गेले. आरोपीतांनी फिर्यादीच्या अंगणात टिनाच्या शेडमध्ये उभी असलेली मारोती व्हॅन तसेच ॲक्टीवा मोटरसायकल व टेबल खुर्च्या, पंखे याची तोडफोड करून नुकसान केले. यानंतर फिर्यादीची पत्नी सौ. उर्मीला या त्यांच्या मधात गेल्या असता त्या लोकांनी फिर्यादीच्या पत्नीला ओढतान करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल अशे कृत्य करून तिचे विनयभंग केले. दरम्यान फिर्यादी घरात लपुन बसले असतांना आरोपीतांनी फिर्यादीच्या पत्नीला 'तुझा नवरा कोठे गेला, त्याला बाहेर काढ' असे म्हणुन शिवीगाळ देत तेथुन सर्व आरोपी निघुन गेले

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,144,146,147,148,149,294,354,427,452,188,323,504,506 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार देशमुख 9922447045 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर